**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

चौथा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**Email Id: tnt1.sesd-mh@nic.in**

---

क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ०३/टीएनटी-१ दिनांक : २९ ऑगस्ट, २०२५.

प्रति,

आयुक्त (शिक्षण),

महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय:** शिक्षक पात्रता परिक्षा (TET)-२०१९ या परिक्षेतील गैरप्रकारांशी संबंधित उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत.

**संदर्भ :** १) आपले पत्र क्र. आस्था/प्राथ-१०६/पवित्र/ टि.ई.टि.-गैप्र-न्या.प्र. /२०२५/ १३१४१५०, दि. ०७.०७.२०२५

२) रिट याचिका क्र. ८५३४/२०२३ व इतर ५३ समान स्वरुपाच्या याचिका, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. १४.०९.२०२३ चे आदेश

३) रिट याचिका क्र. ९६११/२०२४, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. ०६.०९.२०२४ चे आदेश

४) रिट याचिका क्र. ९८२६ व ११९१२/२०२४, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. ०६.०९.२०२४ चे आदेश

५) रिट याचिका क्र. ६८७८/२०२४ . मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांचे दि. ०४.०२.२०२५ चे आदेश

६) रिट याचिका क्र. १२६९/२०२५,मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. २५.०३.२०२५ चे आदेश

७) रिट याचिका क्र. ९५५८/२०२४, मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. २५.०३.२०२५ चे आदेश

८) रिट याचिका क्र. ५८१७/२०२५, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दि. ३०.०४.२०२५ चे आदेश

**महोदय,**

शिक्षक पात्रता परिक्षा -२०१९ मधील गैरप्रकाराच्या अनुषंगाने सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर, पुणे येथे दाखल असलेल्या गु.र.नं. ५६/२०२१ व ५८/२०२१ या प्रकरणी झालेल्या तपासात ज्या उमेदवारांची नावे आढळून आली आहेत व ज्यांनी सीटीईटी अथवा बी.एड या आधारावर TAIT-२०२२

ही परिक्षा उत्तीर्ण केली आहे व ज्यांनी शिक्षण सेवक पदावर नियुक्ती मिळावी म्हणून मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांवर न्यायनिर्णय पारीत झाले आहेत, अशा उमेदवारांच्या संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

२. सर्व उमेदवारांच्या बाबतीत स्वतंत्रपणे सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांच्याकडून चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करुन घेण्यात यावा. नियुक्ती प्राधिकारी यांनी याराठी आवश्यक तो पाठपुरावा करावा. उमेदवारावर गुन्हा नोंदविण्यात आल्याचे अथवा त्यास सह आरोपी केले असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यास त्यास नियुक्ती देण्यात येऊ नये. उमेदवारावर अद्यापि गुन्हा नोंदविण्यात आला नाही अथवा त्यास सह आरोपी करण्यात आले नाही, असा अहवाल प्राप्त झाल्यास या पत्रासोबत जोडलेल्या नमुन्यात Notarized शपथपत्र उमेदवारांने सादर केल्यास त्यास शिक्षण सेवक पदावर नियुक्ती देण्याबाबतची कार्यवाही नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करावी.

आपला,

(शरद माकणे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे.

२) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व).

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)/आयुक्त (महानगरपालिका) (सर्व)/मुख्याधिकारी (नगरपरिषद) (सर्व).

५) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक) (सर्व)/शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई (सर्व)

६) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर, पुणे यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तावातंर्गत उमेदवारांवर भविष्यात गुन्हा दाखल झाल्यास अथवा त्यांना सह आरोपी करण्यात आल्यास यावाबत तातडीने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच आयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांना अवगत करावे.

शासन पत्र क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ०३/टीएनटी-१, दिनांक : २९ ऑगस्ट, २०२५ सोबतचा

Notarized शपथपत्राचा नमुना

मी ----- वय ----रा. ---- भ्रमणध्वनी क्र. ----- शपथपूर्वक असे नमूद करतो की, शिक्षक पात्रता परिक्षा-२०१९ मधील गैरप्रकारांशी संबंधित प्रकरणात सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु.र.नं. ५६/२०२१ व ५८/२०२१ या गुन्हयांची नोंद आहे. या गुन्हयाच्या तपासात माझे नाव आढळून आले आहे. पोलिस यंत्रणेकडून करण्यात येत असलेल्या तपासात भविष्यात कोणत्याही गुन्हेगारी कृत्यात अथवा गैरप्रकारात माझा सहभाग आढळून आल्याने माझ्यावर गुन्हा नोंदविण्यात आल्यास अथवा मला सह आरोपी करण्यात आल्यास व तसा अहवाल आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य/आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद/संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना प्राप्त झाल्यास माझी नियुक्ती कोणत्याही पूर्व-सूचनेशिवाय संपुष्टात आणली जाईल याची मला जाणीव असून तसे करण्यास माझी कोणतीही हरकत नाही.

ठिकाण :

दिनांक : उमेदवारांचे नाव व सही